# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र.७३५३/२०२६

श्रीमती शबाना रहिम मन्सुरी,
वार्ड क्र.2, माऊली किराणाजवळ,
अहिल्यादेवीनगर, श्रीरामपूर,
ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर-413709.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,
आमदार निवास (सा.बां), उपविभाग, फोर्ट, मुंबइ-400001

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक,
आमदार निवास (सा.बां), उपविभाग, फोर्ट, मुंबइ-400001

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०९.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०६.२०२१ | -- | २६.०८.२०२२ | -- |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक ०४/०६/२०२१ रोजीच्या जोडपत्रानुसार आकाशवाणी आमदार निवास, मॅजेस्टिक आमदार निवास यांच्या सन २०२१-२०२२ या कालावधीत देखभाल, दुरुस्तीच्या कामाच्या वर्क ऑर्डरच्या छायांकित प्रती देण्याची विनंती केली असून उपरोक्त माहिती ही **महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २०१२ यातील कलम ३ (क)** नुसार नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना सुचित केले. त्याविरुद्ध अपिलार्थीनी दिनांक २६/०८/२०२२ रोजी अपिल अर्ज दाखल केला असून त्यावर दिनांक २७/०९/२०२२ सुनावणी ठेवण्यात आली होती. तथापि, विहित मुदतीत आदेश पारित केला नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रस्तुत अपील अर्ज दाखल केला आहे. अशाच प्रकारच्या प्रकरणामध्ये श्री.संग्राम सिंह महाडिक विरुद्ध जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग **अपिल क्र.मुमाआ/नों.क्र.८८४/२०२१/४४१७/२०२६** दिनांक ०१/०६/२०२६ रोजीच्या आदेशातील खालील परिच्छेदाच्या अधीन राहून प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी उपस्थित केलेली बाब ही अतिशय महत्त्वाची असून या आधीच **मा.कोकण खंडपीठाने कलम १९ (८)** अन्वये निर्देश जारी केलेले असून सद्य:स्थितीत सर्वच खंडपीठांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने हाती घेण्यात आलेली विकास कामे, या संदर्भातील विविध योजना, त्यासाठी राबविण्यात आलेली प्रक्रिया, आवंठित करण्यात आलेला निधी, झालेला खर्च, कामाचा टप्पा, कामाचा दर्जा या संदर्भात विविध शासकीय प्राधिकरण तसेच माननीय मुख्यमंत्री स्तरावर देखील मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असतात. तसेच लोकप्रतिनिधींद्वारा देखील सार्वजनिक बांधकाम विभागासंदर्भात सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात असून अशा सर्व शंकांना योग्य उत्तर देण्यासाठी सर्व प्रकारची माहिती ही स्वयंप्रेरणेने (Proactive disclosure) उघड करणे आवश्यक असून प्रस्तुत प्रकरणी **कलम १९ (८) व २५ (५) अन्वये खालील निर्देश देण्यात येत आहेत:-**

**कलम १९ (८) :-** केंद्रीय माहिती आयोगास किंवा यथास्थिती राज्य माहिती आयोगास आपल्या निर्णय प्रक्रियेत पुढील अधिकार असतील.

(क) या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करणे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाय योजना करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे ज्यामध्ये पुढील गोष्टींचाही समावेश असेल:-

(एक) एखाद्या विशिष्ट स्वरूपात माहिती मिळण्याची विनंती केली असल्यास त्या स्वरूपात माहिती पुरवणे.

(दोन) केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची किंवा यथास्थिती राज्य जन माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

(तीन) विवक्षित माहिती किंवा माहितीचे प्रवर्ग प्रसिद्ध करणे.

(चार) अभिलेख ठेवणे त्याची व्यवस्था ठेवणे व तो नष्ट करणे या संबंधातील त्याच्या पद्धतीत आवश्यक ते बदल करणे.

(पाच) त्याच्या अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकाराचे प्रशिक्षण देण्याच्या तरतुदीत वाढ करणे.

(सहा) कलम ४ च्या पोट कलम (१) च्या खंड (ख) चे अनुपालन करून आयोगाला आर्थिक अहवाल सादर करणे.

(ख) कोणत्याही नुकसानीबद्दल किंवा झालेल्या अन्या हानीबद्दल भरपाई देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे.

(ग) या अधिनियमामध्ये तरतूद केलेली कोणतीही शासकीय लादणे.

(घ) अर्ज फेटाळणे.

**कलम २५ (५) : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २५** (५) अधिनियमान्वये सार्वजनिक प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासंबंधीची त्यांची कार्यपद्धती या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा आशयाची अनुरूप नाही, असे यथास्थिती केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग यांना दिसून आल्यास आयोगास अशी अनुरूपता आणण्यासाठी त्यांच्या मते ज्या उपायोजना करणे आवश्यक असेल त्या विनिर्दिष्ट करण्याची प्राधिकरणांना शिफारस करता येईल.

सार्वजनिक बांधकाम विभाग हे सार्वजनिक प्राधिकरण असल्याने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून **कलम ४ (१) (ख) (११)** अन्वये योजना आणि कामांबाबतची सर्व माहिती दर ३ महिन्यांनी अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच दिनांक १५.०७.२०१५ रोजी कोकण खंडपीठाने जारी केलेल्या निर्देशाप्रमाणे अद्ययावत माहिती संकेतस्थळावर प्रत्येक विभाग व उपविभागाकरिता स्वतंत्र **Thread** देऊन त्यामध्ये संबंधित विभागाद्वारे हाती घेण्यात आलेली कामे, सुरू असलेली बांधकाम/ रस्ते/ विविध विकास प्रकल्प यांचा तपशील त्या संदर्भात निविदा प्रक्रिया राबविली असल्यास व ती अंतिम झाली असल्यास त्या संदर्भातील तपशील, मंजूर केलेली रक्कम, उपरोक्त कामास प्रशासकीय मंजुरी मिळाल्याचा तपशील, आर्थिक वर्षनिहाय झालेला खर्च, प्रस्तावित खर्च, शिल्लक रक्कम, प्रदान करण्यात आलेली देयके व प्रलंबित असलेली देयके, संबंधित प्राधिकरणाने झालेल्या विकास कामाचे अवलोकन केल्यानंतर सादर केलेला प्रगती अहवाल, संबंधित कामाच्या दर्जाबाबत प्राधिकरणाने दिलेले प्रमाणपत्र, काम पूर्ण झाले असल्यास त्यासंदर्भात देण्यात आलेले प्रमाणपत्र, अंतिम देयक प्रदान केल्याबाबतचा तपशील, संबंधित काम हे सदोष आढळल्यास कंत्राटदारावर करण्यात आलेली कार्यवाही (कारणे दाखवा नोटीस), इ.असे सदोष बांधकाम दुरुस्त केल्याबाबत प्राप्त अहवालाची प्रत इत्यादी बाबींचा समावेश असावा.

राज्य सरकार अधिकाअधिक माहिती ही स्वयंप्रेरणेने उघड करण्याबाबत आग्रही असून मा.मुख्यमंत्री महोदयांनी नुकतीच महाराष्ट्र शासनातील सर्व प्रशासकीय व्यवस्था पारदर्शक, तंत्र व नागरिक स्नेही **(Techno friendly and Citizen friendly)** असावी असे वारंवार अधोरेखित केले असून विद्यमान मा.अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यासंदर्भात योग्य ते प्रशासकीय निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व विभाग व उपविभागीय अधिकाऱ्यांना प्रचलित पद्धतीनुसार देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र. ७३५३/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** — **( राहुल भा.पांडे )**
**दिनांक : २१.०९.२०२६** — **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

RAHUL BHALCHANDRA PANDE

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA PANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:Maharashtra State Chief Information Commission Mumbai, o=Maharashtra State Chief Information Commission Mumbai, ou=State Information Commission, 2.5.4.20=211FC8BA99B710538561CE022F16DB877507502E9F09443B2466F775AF4FDB2A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1CEAB2634AF0275602A939C8218A713079109F9B806F4EF6C4B02C512873C5C2, cn=RAHUL BHALCHANDRA PANDE
Date: 2026.10.19 12:38:56 +05'30'